**<u>ठळक बातम्या</u>**

- महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायचा उद्या शेवटचा दिवस

- मुंबईत काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे, रासपकडून उमेदवारी अर्ज वाटपाला सुरुवात

- पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक एकत्र लढवण्याची घोषणा, महायुतीत मित्रपक्षांना सन्मानजनक जागा देण्याचं भाजपाचं स्पष्टीकरण

**आणि**

- नववर्ष स्वागतासाठी सर्वत्र जोरदार तयारी, एमटीडीसीचे रिसॉर्ट फुल्ल

**<><><><><>**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन आणि राजकीय पक्षांची तयारी जोरात सुरू आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्यामुळे राज्यभरात आज अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली. स्थानिक गणितं लक्षात घेऊन वेगवेगळ्या पक्षांच्या आघाड्या बनत आहेत, तसंच अनेक नेते पक्षांतर करत आहेत. याविषयी अधिक माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**---------------व्हीसी---------------**

*(मुंबईसाठी काँग्रेसने ८७ उमेदवारांची तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. काँग्रेससोबत निवडणूक लढवत असलेल्या राष्ट्रीय समाज पक्षानं मंबईसाठी ६ उमेदवार आज जाहीर केले. तर महायुतीने रिपब्लिकन पक्षाला किमान १६ जागा द्याव्यात, अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबई अध्यक्ष राखी जाधव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपामधे प्रवेश केला.*

***मनसे**ने आपल्या उमेदवारांना एबी फॉर्म द्यायला आज सुरूवात केली. त्याआधी राज ठाकरे यांनी एका बैठकीत पदाधिकाऱ्यांना संबोधित केलं. युतीचा धर्म काटेकोर पाळायचा असून निवडणूक ताकदीने लढायची आहे, असा संदेश राज ठाकरे यांनी दिल्याचं मनसे नेते*

*बाळा नांदगावकर यांनी वार्ताहरांना  सांगितलं. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. कोविड महामारीच्या काळात महाविकास आघाडीने के ेलेल्या कामगिरीची माहिती यात दिली आहे.*

***ठाणे*** *महानगरपालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याचं काँग्रेस नेते विक्रांत चव्हाण यांनी आज माध्यमांना सांगितलं.*

***पिंपरी*** *चिंचवडप्रमाणे पुण्यात शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचे पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत, अशी  घोषणा अजित पवार यांनी काल केली. याला आमदार रोहित पवार यांनी आज दुजोरा दिला. दोन्ही पक्ष आपापल्या चिन्हांवर लढतील असं त्यांनी सांगितलं. दुसरीकडे पुण्यासाठी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे आणि  वंचित  बहुजन  आघाडी हे एकत्र निवडणूक लढणार आहेत. पण पिंपरी चिंचवडमधे वंचित बहुजन आघाडी स्वतंत्र लढणार आहे.*

*पुणे महापालिकेची निवडणूक भाजपा, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुती म्हणून लढवत असून मित्र पक्षांना सन्मानजनक जागा देण्यात येतील भाजपाचे गणेश बिडकर यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.*

*भारतीय जनता पक्षाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यकर्त्यांना डावलून पक्षाशी संबंधित नसलेल्यांना तिकीट दिल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने आज भाजपच्या पुणे शहर कार्यालयासमोर धरणे आंदोलन केलं. यंदाच्या निवडणुकीत आरपीआयला सहा जागांवर उमेदवारी दिली आहे.*

*एमआयएम पक्षाने ठाणे महानगरपालिकेसाठी ५, तसंच वसई विरार महानगरपालिका निवडणुकीसाठी ३ उमेदवार जाहीर केले आहेत. आपला पक्ष भिवंडी निजामपूर तसंच तळोजा इथंही उमेदवार देणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी सांगितलं.* **नांदेड***मधे एमआयएमने वीस जणांची पहिली यादी जाहीर केली आहे.*

***जळगावात*** *शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ३८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३७ जागा लढवणार आहे.*

***धुळे*** *महानगरपालिकेत भाजप आणि शिवसेनेने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. तर महाविकास आघाडीचे तिन्ही घटक पक्ष एकत्रित लढणार आहेत.*

***सोलापुरात*** *भाजपाबरोबर शिवसेनेची चर्चा निष्फळ ठरली असून तिथं राष्ट्रवादीबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याचं पक्ष प्रवक्ते सिद्धराम म्हेत्रे यांनी सांगितलं. दरम्यान, आज अर्ज दाखल करण्यासाठी विविध पक्षांच्या उमेदवारांनी निवडणूक कार्यालयात मोठी गर्दी केली होती.*

***अमरावतीत*** *शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.*

***नाशिक****मधे उमेदवारी अर्ज भरायला आलेल्या उमेदवारांना अर्ज भरायला विलंब होत असल्याने काही काळ गोंधळ उडाला आणि काही काळ अर्ज भरायची प्रक्रिया थांबली. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती पूर्ववत झाली.)*

**<><><><><>**

भंडारा नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक तीन मध्ये उमेदवाराचं नाव मतमोजणीवेळी गायब झाल्यानं आज त्या विरोधात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांचं नाव मतमोजणी दरम्यान ईव्हीएममधून गायब झाल्यामुळे हा मोर्चा काढण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही तर येत्या १२ जानेवारी रोजी भंडारा बंदचं आवाहन मोर्चेकऱ्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या विविध नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या नगराध्यक्षांनी आज पदभार स्वीकारला. रत्नागिरीच्या नगराध्यक्षा शिवसेनेच्या शिल्पा सुर्वे , गुहागर नगर पंचायतीच्या अध्यक्षा म्हणून भाजपच्या नीता मालप, खेडच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या माधवी बुटाला , देवरूख नगर पंचायतीच्या अध्यक्ष भाजपच्या मृणाल शेट्ये, चिपळूणचे नगराध्यक्ष शिवसेनेचे उमेश सकपाळ, तर लांजा नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष म्हणून शिवसेनेच्याच सावली कुरूप यांनी पदभार स्विकारला. राजापूरच्या नगराध्यक्षपदाची सूत्रं काँग्रेसच्या हुस्नबानू खलिफे यांनी गेल्या आठवड्यात स्वीकारली होती.

**<><><><><>**

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने मुंबईतल्या विविध खासगी आणि सार्वजनिक स्थळांवर होणाऱ्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन दलाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. अग्निसुरक्षा उपकरणं सुस्थितीत आणि कार्यान्वित ठेवावीत, दिशादर्शक फलकांचा समावेश,

गॅस जोडण्या आणि विद्युत यंत्रणांची तपासणी, ज्वलनशील साहित्यं टाळणं अशा विविध सूचनांचा त्यात समावेश आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी जास्त गर्दी टाळावी, फटाके किंवा इतर आतिषबाजी करू नये, असं आवाहनही नागरिकांना करण्यात आलं आहे.

नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी नियमांचं पालन न करणाऱ्या वाहन चालकांविरुद्धची मोहीम कडक केली आहे. गेल्या चार दिवसांत पोलिसांनी शहराच्या विविध भागांमध्ये नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. यामध्ये मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या २४२ वाहन चालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

नववर्षाच्या स्वागतासाठी नागपूर आणि परिसरातील महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाचे सर्व रिसॉर्ट १०० टक्के भरले आहेत, तर खासगी हॉटेल्समध्येही सुमारे ८० टक्के बुकिंग झाले आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्प, पेंच-सिल्लारी, नवेगाव-नागझिरा, नवेगावबांध, बोदलकसा, इथल्या पर्यटक निवासांना मोठी पसंती मिळत आहे. नाताळ आणि ३१ डिसेंबरच्या सुट्ट्यांमुळे कौटुंबिक पर्यटकांचा ओघ वाढला असून वन्यप्रेमी आणि निसर्ग पर्यटन केंद्रे हाऊसफुल्ल झाली आहेत. एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये रोषणाई, स्थानिक खाद्यपदार्थ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आल असून, बुकिंगसाठी सतत चौकशी होत असल्याची माहिती एमटीडीसी प्रशासनान दिली.

**<><><><><>**

ग्रामीण रोजगारासाठीच्या व्हीबी जी राम जी या कायद्यामुळे राज्य सरकारांना गेल्या सात वर्षांच्या तुलनेत १७ हजार कोटी रुपयांचा नफा होणार आहे. तसंच राज्यांच्या निधी वितरणात देखील सुधारणा होईल, असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका अहवालात म्हटलं आहे. उत्पादक मालमत्ता निर्मितीला चालना देणं, उत्पन्नात वाढ करणं तसंच नियमन प्रणाली कार्यक्षम करणं हे या कायद्यामुळे साध्य होणार आहे. पारदर्शकता, नियोजन, तसंच जबाबदारी ठरवून रोजगार निर्मिती केल्यामुळे आधीच्या कायद्यातल्या संरचनात्मक त्रुटी नव्या कायद्यामुळे दूर होतील, असं एसबीआयचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉक्टर सौम्य कांती घोष यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय कापूस महामंडळाच्या खरेदी केंद्राच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरता राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज अचानक धुळे जिल्ह्यातल्या दोंडाईचा इथल्या कापूस खरेदी केंद्राला भेट दिली. यावेळी रावल यांनी कापूस नोंदणी, स्लॉट बुकिंग आणि प्रत्यक्ष खरेदी प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या अडचणी तात्काळ सोडवण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

<><><><>

दररोज नवनवे विक्रम गाठणाऱ्या चांदीच्या दरांनी आज किलोमागे अडीच लाख रुपयांना स्पर्श केला होता. मुंबईच्या बाजारात दिवसाच्या सुरुवातीला चांदीचे दर ११ हजार रुपयांनी वाढून २ लाख ४३ हजार रुपयांच्या पुढे गेले होते. जीएसटीसह हा दर अडीच लाखांच्या पलीकडे गेला. पण दिवसअखेर त्यात घसरण झाली आणि सव्वा ३ हजार रुपयांनी महाग होऊन चांदी २ लाख ४२ हजार ५०० रुपये किलो या दरावर स्थिरावली.

सोनं आज अकराशे रुपयांनी स्वस्त झालं. २९ कॅरेट सोनं तोळ्यामागे १ लाख ४० हजार रुपयांना तर २२ कॅरेट सोनं १ लाख ३७ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीला मिळत होतं.

<><><><>

मुंबईतल्या एका महिलेला डिजिटल अटकेची भिती दाखवून पैसे उकळल्याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुजरातमधून एकाला ताब्यात घेतलं. या घटनेतल्या महिलेकडून यावर्षी ऑगस्टमध्ये न्यायमूर्ती चंद्रचूड असल्याची बतावणी करुन सायबर गुन्हेगारांनी तीन कोटी ७१ लाख उकळले होते. सुरत इथल्या या संशयिताने कापड व्यापाराशी संबधित बनावट कंपनीच्या नावाने बँकेत खाते चालू खाते उघडले होते. सायबर गुन्हेगारांनी उकळलेले पैसे ठेवण्यासाठी या खात्याचा वापर केला होता. या प्रकरणातील दोन्ही सुत्रधार परदेशात पळून गेल्याचं त्याने सांगितलं.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाखाली आज पालघर इथं एक उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत डीएफसीसी अर्थात वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, विरार–डहाणू रेल्वे चौपदरीकरण,

मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन, बोरीवली–विरार पाचवी आणि सहावी मार्गिका तसचं रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पांशी संबंधित भूसंपादन तसंच अनुदान वितरणासह अन्य अडचणींविषयी सखोल चर्चा झाली.

//<><><><><>//